**24 व्या इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA) मंत्री परिषदेची बैठक (COM) (21 मे 2025)**

21 मे 2025

24 व्या इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA) मंत्री परिषदेची बैठक (COM) ही IORA चेअर श्रीलंका यांनी 21 मे 2025 रोजी "भावी पिढीसाठी शाश्वत हिंदी महासागर" या संकल्पनेच्या अंतर्गत आयोजित केली होती”. श्री पी. कुमारन, सचिव (पूर्व), यांनी IORA COM च्या 24 व्या बैठकीत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले.

2. भारत सध्या IORA चे उपाध्यक्ष भूषवित आहे आणि ट्रोइकाचा भाग आहे. भारत 2025-2027 साठी IORA ची अध्यक्षतेची सूत्रे सांभाळेल. 24 व्या COM बैठकीत सर्व 22 IORA सदस्य देश आणि IORA 12 संवाद भागीदारांचे मंत्री आणि उच्च स्तरीय प्रतिनिधी यांनी सहभाग नोंदविला. बैठकीदरम्यान, सदस्य राष्ट्रांनी IORA बळकट करण्यावर, प्रादेशिक हिताच्या बाबींवर चर्चा केली आणि 'कोलंबो प्रसिद्धीपत्रक' स्वीकारले.

3. सचिव (पूर्व) यांनी आपल्या निवेदनात हिंद महासागरातील राष्ट्रांच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी भारताची वचनबद्धता अधोरेखित केली. जी भारताच्या हिंद महासागर क्षेत्राच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. सदस्य देशांमध्ये सहकार्य, सहयोग आणि एकत्रित प्रयत्न हे हिंद महासागर क्षेत्रातील सामान्य हिताच्या मुद्द्यांवर एकत्रित होण्यासाठी आवश्यक आहेत असे त्यांनी नमूद केले. सचिव (पूर्व) यांनी पुष्टी केली की दहशतवादाच्या सर्व स्वरुपात आणि अभिव्यक्तींमध्ये, राज्य-पुरस्कृत असो किंवा व्यक्तींद्वारे संचलित असो, या प्रदेशाच्या शांतता, सुरक्षितता आणि विकासासाठी गंभीर धोका निर्माण करतो आणि त्याचा स्पष्टपणे निषेध केला पाहिजे.

नवी दिल्ली

21 मे 2025